# जनसंपर्क अधिकारी कार्यालय,
# ठाणे शहर पोलीस

THANE POLICE COMMISSIONERATE

## प्रेसनोट

### लोकसभा निवडणुक २०२४ च्या पार्श्वभुमीवर खंडणी विरोधी पथक व विशेष कृती दल, गुन्हे शाखा, ठाणे शहर कडून सराईत गुन्हेगारास अग्नीशस्त्र साठयासह अटक केले बाबत

---

लोकसभा निवडणुक प्रकीया २०२४ कायदा व सुव्यवस्थेस बाधा न येता शांततेत पार पडावी याकरीता मा. पोलीस आयुक्त सो, ठाणे शहर यांनी गुन्हे शाखेच्या पथकांना जास्तीत जास्त अवैध शस्त्र, अंमली पदार्थ विरोधी कारवाया करणे बाबत सक्त आदेश दिले आहेत. सदर आदेशाची अंमलबाजवणी करण्यांच्या अनुषंगाने दिनांक १८/०४/२०२४ रोजी खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर प्रयत्नशील असताना सपोनि/सुनिल तारमळे व पोउनि/विजयकुमार राठोड यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शंभु महतो नावाचा इसम त्याचेकडे मोठया प्रमाणावर अवैध अग्नीशस्त्र, काडतुसे, गावठी कट्टे घेवुन विक्रीकरीता साकेत रोड, राबोडी, ठाणे येथे येणार आहे.

सदर बातमीचे अनुषंगाने सपोआ/श्री. शेखर बागडे, विशेष कृती दल, गुन्हे शाखा, ठाणे शहर व महीला पोलीस निरीक्षक वनिता पाटील यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाने साकेत रोड, राबोडी, ठाणे पश्चिम येथे सापळा रचला असता **शंभु सुरेश महतो, वय ३५ वर्षे,** धंदा बेकर, रा. टागोर नगर विक्रोळी पुर्व, मुबई मुळ गाव– बिहार हा अवैध रित्या अग्निशस्त्रासह मा.पोलीस आयुक्त सो ठाणे शहर यांनी जारी केलेल्या मनाई आदेशाचा भंग करीत असताना मिळुन आला त्याचेविरूध्द राबोडी पोलीस स्टेशन गु.र.न **४५४/२०२४ शस्त्र अधिनियम कलम. ३, २५(१ब)(अ) सह महा.पो.का.कलम ३७(१)१३५ अन्वये** गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीची दिनांक २५/०४/२०२४ रोजीपावेतो पोलीस कोठडी रिमांड मंजूर आहे.

गुन्हयाचे तपासादरम्यान नमुद आरोपीकडून खंडणी विरोधी पथकाने आरोपीकडुन **एकूण ४ पिस्टल, २ गावठी कटटे, १ मॅगझीन व १८ जिवंत काडतुसे असे एकूण ३,४०,०००/– रूपये किमतीचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे.** नमुद आरोपी इसमाने वरील अग्नीशस्त्र साठा नेमका कोणत्या कारणासाठी आणला होता याबाबत पुढील तपास खंडणी विरोधी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक सुनिल तारमळे करीत आहेत. पोलीसांनी केलेल्या तपासात नमुद आरोपी हा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याचे विरूध्द रबाळे पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे खूनाचा गुन्हा दाखल असुन तो जामीनावर बाहेर असल्याचे आढळुन आले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर श्री. आशुतोष डुंबरे, मा. पोलीस सह आयुक्त, श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा. अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंजाबराव उगले, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री शिवराज पाटील, मा. सहायक पोलीस आयुक्त श्री राजकुमार डोंगरे, शोध –२, गुन्हे शाखा, ठाणे शहर, सहायक पोलीस आयुक्त श्री. शेखर बागडे, विशेष कार्य दल, गुन्हे शाखा, ठाणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकातील मपोनि/वनिता पाटील, सपोनि/श्रीकृष्ण गोरे, सपोनि/भुषण कापडणीस, सपोनि/सुनिल तारमळे, पोउनि/विजयकुमार राठोड, सपोउनि/सुभाष तावडे, सपोउनि/कल्याण ढोकणे, सपोउनि/संजय बाबर, पोहवा/सचिन शिंपी, पोहवा/योगीराज कानडे, पोहवा/संजय राठोड, पोहवा/गणेश गुरसाळी, मपोहवा/शितल पावसकर, मपोशि/मयुरी भोसले, पोशि/तानाजी पाटील, पोशि/अरविंद शेजवळ, पोशि/विनोद ढाकणे चापोना/भगवान हिवरे यांनी केली आहे.

***************